# पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत

मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड (युनिट नं.२) यांच्या प्लॉट नं. अ-२७, एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ जिल्हा-सोलापूर येथील प्रस्तावित बल्क ड्रग्ज व इंटरमेडीएटस् प्रकल्पाच्या वाढीव उत्पादन क्षमता (१२३.५ मे.टन/महिना वरून ४९२.५ मे.टन/महिना) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.

मे. स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड (युनिट नं.२) यांच्या प्लॉट नं. अ-२७, एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ जिल्हा- सोलापूर येथील प्रस्तावित बल्क ड्रग्ज व इंटरमेडीएटस् प्रकल्पाच्या वाढीव उत्पादन क्षमता (१२३.५ मे.टन/महिना वरून ४९२.५ मे.टन/महिना) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक १३ जून, २०१७ रोजी दुपारी ०१.०० वाजता, प्लॉट न. पी-७, उद्योग भवन, सोलापूर इंडस्ट्रीज असोशिएशन ईमारत, चिंचोली एमआयडीसी, या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४४/२०१७,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २२६७, दि. ०३-०६-२०१७ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री अजित रेळेकर, - अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
(मा. जिल्हादंडाधिकारी,सोलापूर यांचे प्रतिनिधी)

२) श्री ज. शं. साळुंखे, - सदस्य
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री न. सं. अवताडे, - समन्वयक
प्रभारी -उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सोलापूर

श्री अवताडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या

अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री औताडे यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांना मेसर्स स्मृती ऑरगॅनिक्स लिमिटेड (युनिट नं.२) यांच्या प्लॉट नं. अ-२७, एम.आय.डी.सी. चिंचोली, तालुका-मोहोळ जिल्हा- सोलापूर येथील प्रस्तावित बल्क ड्रग्ज व इंटरमेडीएटस् प्रकल्पाच्या वाढीव उत्पादन क्षमता (१२३.५ मे.टन/महिना वरून ४९२.५ मे.टन/महिना) संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागात कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये संवर्ग ब ५ (एफ) मध्ये जरी मोडत असला तरी प्रकल्प स्थानापासून सुमारे २.२२ कि.मी. अंतरावर पक्ष्यांचे संरक्षित अभ्यारण्य असून प्रकल्पाचा काही भाग हा औद्योगिक विकास महामंडळाच्या कक्षेबाहेरील जागेत वसविला असल्याने प्रस्ताव संवर्ग अ मध्ये मोडत असल्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाच्या पुनर्गठित समिती (उद्योग) ने ३६ व्या बैठकीदरम्यान दिनांक १६-१७ मार्च, २०१५ रोजी त्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत व दैनिक संचार यामध्ये मराठी व इंग्रजी भाषेमध्ये दिनांक १३ मे, २०१७ रोजी लोकहित जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित

प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर , जिल्हा परिषद, सोलापूर, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर, तहसील कार्यालय, मोहोळ, ग्रामपंचायत कार्यालये चिंचोली, बिबिदारफळ, सावलेश्वर, पाकणी व कोंडी जिल्हा. सोलापूर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते. समन्वयक यांनी असे सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत काही लेखी आक्षेप या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. श्री अवताडे यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री अजित रेळेकर, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून सादर करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. श्री अजित रेळेकर, अध्यक्ष यांनी सर्व जनसमूहाला त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

श्री किसन केराप्पा धूत, रा. चिंचोली काटी गाव यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी सादरीकरणात जे जे सांगितले ते पूर्णपणे चुकीचे आहे. त्यांनी सांगितले की त्यांची शेती प्रकल्पाच्या जवळच असून कंपनीच्या सांडपाण्याने खराब झालेली आहे. जवळील शेते नापीक झालेली आहेत. त्याचप्रमाणे जवळील पिण्याचे पाण्याचे स्त्रोत व विहिरींचे पाणी खराब झालेले आहे. गाई म्हशींनी ते पाणी पायल्यास त्या मरतात. प्रकल्प सुरु झाल्यापासून गेले १५-१६ वर्षे प्रकल्प अधिका-यांनी प्रदूषण नियंत्रणाबाबत काहिही केलेले नाही. परिसरातील नागरिकांनी ब-याच वेळा लेखी तक्रारी दिलेल्या आहेत. त्याचा काहीही उपयोग होत नाही. प्रकल्प अधिका-यांना तक्रार करण्यास गेल्यास ते दमदाटी करतात. जर कार्यान्वित प्रकल्पाचा गेले १५-१६ वर्षे प्रदूषणाचा प्रश्न सुटलेला नाही, तर विस्तारिकरणामुळे काय होईल अशी भिती स्थानिक ग्रामस्थांमध्ये आहे. तरी प्रकल्प विस्तारिकरणास स्थानिक जनतेचा विरोध आहे.

श्री राजेश हरिदास पाटील, उपसरपंच, चिंचोली गाव यांनी सांगितले की ब-याच वेळा प्रकल्प प्रशासनास लेखी तक्रारी देऊनही काहीही होत नाही. कंपनीने बळाचा वापर करुन जवळील खाजगी जमिनी ताब्यात घेऊन पंचनामा केलेला आहे. प्रकल्प परिसरातील शेती प्रकल्पातील सांडपाण्यामुळे नापीक झालेली आहे.

उत्तर- प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की भारत सरकारच्या नविन धोरणानुसार सदरहू प्रकल्प हा "झिरो लिक्विड डिस्चार्ज" प्रकल्प असेल. आता कार्यान्वित प्रकल्पात ३५% प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर प्रक्रियेत करण्यात येतो. तर विस्तारिकरणानंतर एकूण सांडपाण्याच्या ५१% प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तकांनी असेही सांगितले की प्रकल्पात रिव्हर्स् ऑस्मोसिस सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. पावसाळ्यात काही वेळेस पावसाचे पाणी उताराकडील शेतात वा परिसरात जात असल्याने एखादा प्रसंग झाला असेल. मात्र प्रकल्प प्रवर्तक वरिल बाबत उपाय योजना करत असतात.

श्री धर्मराज मारुती कोळी, रा. चिंचोली काटी गाव यांनी मत व्यक्त केले की जरी प्रकल्प प्रवर्तक "झिरो लिक्विड डिस्चार्ज" प्रकल्पाची हमी देत असतील, तरीही काहीही करणार नाही. स्थानिक शेतक-यांनी त्यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास आर्थिक-सामाजीक प्रगतीसाठी दिल्या. मात्र त्यांच्या मुलांना प्रकल्पातील रोजगारात संधि दिली जात नाही. परिसरातील विहिरींचे पाणी व जवळील पाण्याचे स्त्रोत हे प्रकल्पातील सांडपाण्यामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे स्थानिक मच्छीमारांना मच्छीमारी बंद करावी लागली असून ते बेकार झालेले आहेत. गुरांनी ते पाणी प्यायल्यास ते मरतात. मात्र प्रकल्प प्रवर्तक याबाबत कुठलीही जबाबदारी घेत नाहीत. स्थानिक युवक कष्टाळू असूनही प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येत नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभाग यांना लेखी तक्रारी पाठवून त्याबाबत त्वरित कारवाई होत नाही.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मत मांडले की जर स्थानिकांना रोजगाराची संधि योग्य प्रकारे दिली तर इतर कुठलेही प्रश्न प्रकल्पामुळे होत नाहीत असे समजावे का? उपस्थित स्थानिकांनी सांगितले की प्रकल्पाच्या प्रदूषणाचा त्रास नागरिकांना होत असून पर्यावरणाचे नुकसान होत आहे.

श्री दिलीप अलगर, राहणार-चिंचोली काटी गाव यांनी समितीस बैठकीनंतर परिसराची पाहणी करण्याचे आवाहन केले. परिसरातील शेती नापीक झालेली असून पर्यावरणास सदरहू प्रकल्पामुळे धोका आहे.

श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी हैद्राबाद यांनी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण संरक्षण योजना राबविण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे १० कि.मी. परिसरातील आरोग्य अहवाल तयार करण्याची सूचना केली. पावसाचे पाणी जमिनीत जिरवून पाणी पुनर्वापर करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सीएसआर फंडांतर्गत स्थानिक युवकांना स्कील डेव्हलपमेंट योजनेतंर्गत प्रशिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आवश्यक आहे. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की श्री सुनंदन रेड्डी यांचे लेखी निवेदन प्राप्त झालेले असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की भारत सरकारच्या नविन धोरणाप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक सदरहू प्रकल्प "झिरो लिक्विड डिस्चार्ज" प्रकल्पाची हमी देत आहेत. मात्र कार्यान्वित प्रकल्पातील सांडपाण्यामुळे परिसरातील विहिरी व जल स्त्रोत प्रदूषित झाल्याच्या तक्रारी स्थानिक जनता करत आहेत. परिसरातील विहिरींचे पाणी पिण्यायोग्य राहिले नसल्याचे सांगत आहेत. त्याचप्रमाणे शेती नापिक झाल्याचे सांगत आहेत. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा योग्य प्रकारे चालवावीत. त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षण योजना स्थानिकांच्या सहकार्याने राबवाव्यात. समितीने प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण देण्याचे आवाहन केले.

उत्तर- प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिकांनी घेतलेले आक्षेप नाकारुन सांगितले की एमआयडीसीत इतर केमिकल कंपन्या कार्यरत असून सदरहू प्रदूषण हे इतर कंपन्यांमुळे झालेले आहेत. त्यांनी असे सांगितले की शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विहिरींचे पाणी हे शास्त्रीयदृष्ट्या निर्जतुंकीकरण करुनच पिणे आवश्यक आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सुमारे चार कोटींची सयंत्रणा बसविलेली असून प्रकल्पात कार्यान्वित व प्रस्तावित प्रकल्पातील औद्योगिक सांडपाणी दोन भागात असेल. प्रवाह नं.१ मध्ये मोठ्या प्रमाणात टिडीएस व सीओडी व प्रवाह नं.२ मध्ये कमी प्रमाणात टिडीएस व सीओडी असेल. कार्यान्वित व प्रस्तावित प्रकल्पातील संपुर्ण सांडपाण्यावरशास्त्रीयदृष्ट्या प्रक्रिया करुन प्रकल्पातच त्याचा पुनर्वापर करण्यात येईल. प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल.

श्री साळुंखे, सदस्य यांनी मत मांडले की स्थानिकांनी घेतलेल्या आक्षेपांवरुन असा निष्कर्ष येतो की प्रकल्प प्रवर्तक हे कार्यरत प्रकल्पात सांडपाण्यावर शास्त्रीयदृष्ट्या प्रक्रिया व विल्हेवाट लावत नाहीत. त्याचप्रमाणे, सादरीकरणात दाखविल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी १४% हरितपट्टा विकसित केलेला असून शेजारील जमिन घेल्यावरच एकूण ३८% हरितपट्टा होईल. म्हणजेच प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवान्याचे उल्लंघन केलेले आहे हे स्पष्ट होते.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की स्थानिक प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्राप्त झालेल्या लेखी तक्रीरींची वेळोवेळी दखल घेतलेली आहे.

श्री दत्ता भोसले, रा. चिंचोली काटी गाव यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक अवैधपणे लाकडाचा वापर करतात असा स्थानिकांचा आरोप आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना धुराचा त्रास होतो.

उत्तर- समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पास लाकडाच्या वापरास परवानगी दिलेली नाही व तसे आढळ्यास प्रकल्पास योग्य ते आदेश देण्यात येतील.

उत्तर- प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्पात रिव्हर्स ऑस्मोसिस सयंत्रणा बसविण्यात येणार असल्याने सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

श्री महेंद्र वाघमारे, सदस्य ग्रामपंचायत व नारायण किराप्पा धोत्रे यांनी बैठकीनंतर समिताने परिसराची पाहणी करण्याची सूचना केली व त्याचप्रमाणे प्रकल्पामुळे भूगर्भ पाणी खराब झाल्याची तक्रार केली व त्याचे शास्त्रीयदृष्ट्या सर्व्हेषण करुन उपाययोजना करण्याची मागणी केली.

उत्तर- श्री अवताडे, समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की मप्रनि मंडळाने प्राप्त झालेल्या तक्रारींवर वेळोवेळी कारवाई केलेली असून कंपनीची बँक गॅरंटीही जप्त केलेली आहे. येथे उपस्थित असलेल्या स्थानिकांनी कार्यरत प्रकल्पाविषयी घेतलेले आक्षेप, सूचना विचारात घेऊन एक सर्व्हेक्षण करण्यात येईल.

उत्तर- प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी काही बाबींवर समन्वय साधता येऊ शकतो असे मत मांडले. त्यानुसार स्थानिकांचा प्रकल्प अधिका-यांबरोबर सहभाग असलेली एक पर्यावरण योजना समिती गठीत करण्यात यावी व त्या समितीत शासनाच्या महसूल, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे प्रतिनिधी असावेत.

अध्यक्ष , पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की शासनाचा सर्वांगीण विकास करण्याचेच धोरण आहे. मात्र विकासासाठी जमिनी देऊनही विविध प्रकल्पात रोजगार व प्रगतीची संधी न मिळणे याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कुठलाही प्रकल्प हा स्थानिकांच्या सहभागाशिवाय यशस्वी होत नाही हेही प्रकल्प प्रवर्तकांनी लक्षात घ्यावे.

समितीने बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व आक्षेप व सूचनांचा परामर्श घेतला व अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू सुनावणी ही जरी प्रस्तावित उत्पादन विस्तार क्षमतेविषयी असली, तरी कार्यरत प्रकल्पाविषयींच्या आक्षेप, सूचनाही विचारात घेतलेल्या आहेत. भारत सरकारने प्रकल्पास टिओआर मंजूर करताना काही विशेष अटी व शर्ती पाळण्यास सांगितले आहे. केंद्र सरकारने प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज असण्याची अट घातलेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक अत्यंत आधुनिक व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा व सुरक्षितता सयंत्रणा योग्य प्रकारे कार्यान्वित ठेवण्याचे आश्वासन देत आहेत. बैठकीत नोंदविण्यात आलेल्या सूचना, आक्षेपांसह सदरहू सूचना, हरकती पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी इतिवृतान्तात नमुद करुनच सदरहू अहवाल भारत सरकारच्या वने,पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस पाठविला जाईल व तज्ज्ञ समिती याचा सर्व विचार करुन त्याबाबत निर्णय घेईल.

अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी असेही सांगितले की कार्यरत प्रकल्पाविषयी उपस्थित स्थानिक नागरिकांनी जे आक्षेप नोंदविले आहेत. समितीने त्याची नोंद घेऊन संबधित विभाग, स्थानिक जनतेचे दोन प्रतिनिधी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त समिती कडून शहानिशा करण्याची सूचना दिली. त्यासाठी समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर यांनी पुढील पाठपुरावा करण्याची सूचना देण्यात आली. सदरहू समिती उपाय योजनांचा अहवाल शासनास सादर करेल असेही अध्यक्षांनी सांगितले.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीसाठी मोठ्या संख्येत स्थानिकांनी उपस्थित राहून अतिशय अभ्यासू सूचना, हरकती उपस्थित केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक जनता, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानून बैठक संपन्न् झाल्याचे जाहिर केले.

(अजित रेळेकर)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहीर
लोकसुनावणी समिती तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर

(न. सं. अवताडे)
समन्वयक तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी
मप्रनि मंडळ, सोलापूर

(ज. शं. साळुंखे)
सदस्य तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे